ISSN NO. 2320-4915

मराठी साहित्य संशोधन पत्रिका - त्रैमासिक

# अभिनव वाग्विलास

संपादक
डॉ. चं.वि.जोशी

कार्यकारी संपादक
प्रा. गोकुळ शिखरे

सहसंपादक
प्राचार्य डॉ. अशोक शिंदे
श्री. चंद्रकात पालवे

वर्ष -४ थे अंक १ ला

जानेवारी-मार्च २०१६

नोंदणी - MAHAMAR 41094/ 13/1/2012-
TC GOVERNMENT OF INDIA
( मराठी साहित्य संशोधन पत्रिका - त्रैमासिक )
(National Institute of Science Communitation And Information Resources, New Delhi-110067)
कार्यालयाचा पत्ता - संपादक । प्रा. डॉ.चं.वि.जोशी
'अभिनव वाग्विलास ' ( त्रैमासिक )
१०,सारथी, सरस्वती कॉलनी/पोस्ट कॉलनीमागे /
पाईपलाईन रोड, सावेडी जि. अहमदनगर
पीन -४१४००३ ( महाराष्ट्र )
दूरध्वनी- ०२४१-२४२२३१८
प्रकाशिका । प्रा. सुहासिनी जोशी
मुद्रक । सिध्दीगणेश ऑफसेट, केडगांव, अ.नगर
संपर्क - भ्रमणध्वनी - १. संपादक - डॉ.चं.वि.जोशी
९३२५४५९२२९
कार्यकारी संपादक
प्रा. गोकुळ शिखरे -मोबा.९४२३३५८४८०
सहसंपादक
१. डॉ.अशोक शिंदे - ९८८१९४०४४२ ३.
२. श्री. चंद्रकात पालवे - ९३७२४१५५३५
मुखपृष्ठ - ऋतुपर्ण जोशी, अ.नगर
या अंकाची किंमत - ६० रूपये मात्र

**सूचना -**

**या अंकात व्यक्त झालेले विचार त्या त्या शोधनिबंधकांचे आहेत. त्यांच्याशी संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही.तसेच शोधनिबंधातील मजकुराचा व सदर्भाचा संपादक, प्रकाशकाचा काहीही संबंध नाही.ती जबाबदारी सर्वस्वी शोधनिबंध लेखकाचीच आहे.**



।। अनुक्रमणिका ।।

संपादकीय / २

१.संत जनाबाईचे व्यक्तिमत्त्व - डॉ. संगिता शेळके / ३

२. नामदेव ढसाळांचे काव्यविश्व - डॉ. अंजली मस्करेन्हस /१२

३. नामदेव ढसाळ यांच्या कवितेत विद्रोह - प्रा. शिखरे जी.वाय. /१६

४.मराठी लोककलांचे लोकसंस्कृतीतील स्थान - प्रा.ज्योती माने / २०

५. मराठी कवितेचा प्रवास : स्थूल स्वरुप- प्रा.डॉ.चं.वि.जोशी / २७

६. 'श्री ज्ञानेश्वरींतील ' 'अर्जुन नामार्थ विचार'-डॉ. श्याम नेरकर / ३५

७. साहित्य आणि संस्कृती यांचा अनुबंध - डॉ. चंद्रकांत प्रभाकर काळे / ४०

८. संतांचे समाजप्रबोधन / डॉ. अशोक शिंदे / ४६

९.सीमावर्ती परिसरातील लोकगीतातील लोकतत्वे/ डॉ. विठ्ठल जंबाले / ४९

अंकात द्यावयाचे संशोधनपर लेख APS Priyanka 14 किंवा Kruti Dev 50/55 या Fonts मध्येच पाठवावेत. लिहिलेली किंवा चक्रमुद्रित प्रत पाठवू नये. **EMail Id - chandrakantjoshi91@gmail.com** यावर **ससंदर्भ पाठवावेत.** मोबा.- 9325459229

किंवा - देवा तुज आम्ही दिधले थोरपण । पाहे हे वचन शोधुनिया ।
नसता पतित कणि पुसे तुते । सांदिस पडते नाम तुझे ।।

अशाप्रकारे संत नामदेवांच्या समाजप्रबोधनपर विचारांची दखल शीखांच्या गुरु ग्रंथसाहेब या ग्रंथाने घेतलेली दिसते.

संत एकनाथांचे समाजप्रबोधनपर विचार ' भारुड'रचनेतून जास्त जाणवतात. एकनाथी भागवत, भावार्थ रामायण या ग्रंथातून लिहिणारे एकनाथ प्रत्यक्ष अस्पृश्यांची मुले अंगाव खेळवित. त्यांनी गाढवाला पाणी पाजले. पितरांच्या श्राध्दास अस्पृश्यांना पहिल्यांदा जेउ घातले. असा संत एकनाथांचा समाजप्रबोधनपर विचार महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र धर्म वाढवाव असे सांगणारे संत रामदासांच्या मनाचे श्लोक दासबोध ग्रंथातून प्रतिकारशक्तीचा अवलं करुन दृष्ट मनोवृत्तीचा छेद करणारे विचार प्रकट करतात.

याच महाराष्ट्रात संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज, विनोबा भावे , सा गुरुजी, इ. सारखे समाजप्रबोधन करणारे संतही महत्त्वाचेच होते. देव हा देवळात नाही त मानवतेच्या सेवेत आहे. देवाला बोकड कापू नका, दारु पिऊ नका, दुबळ्यांना दया दाखव असे सांगणारे संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाचे खरे पुरस्कर्ते वाटतात. संत तुकडोजींनीह ग्राम स्वराज्याची संकल्पना चांगल्याप्रकारे मांडलेली आहे. संत तुकडोजीच्या 'ग्रामगीते' पारायण आज खरोखर प्रत्येक गावातील नागरिकांनी करण्याची गरज आहे. सं विनोबाजींनी तर भूदान चळवळ निर्माण करुन सर्वोदय कल्पना खऱ्या अर्थाने साकार केली साने गुरुजींनी केवळ 'श्यामची आई' पुस्तक लिहिले नाही तर मातृहृदयाचे ओथंबलेले म समाजविकासासाठी कसे कटीबध्द होते हे त्यांच्या जीवनावरुन लक्षात येते. शेगावचे गजान महाराज, शिर्डीचे साईबाबा, अक्कलकोटचे स्वामी समर्थ या विभूतींना केवळ दैवी अवतारा लेबल न लावता त्यानी त्या काळात लोकनिंदा सहन करुनही लोककल्याणाच्या भूमि निभावल्या व लोकांची दु:खे दूर केली हे समजून घ्यायला हवे.

**- प्राचार्य डॉ.अशोक शिंदे श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासे जि. अ. नग**



# ९. सीमावर्ती परिसरातील लोकगीतातील लोकतत्वे:२०१५

डॉ. विठ्ठल जंबाले

महाराष्ट्र–कर्नाटक–तेलंगणा या त्रिराज्यांच्या सीमालगतच्या परिसरात परंपरामय लोकजीवनात पिढीजात लोकतत्व आढळतात. देगलूर येथे वास्तव्य करीत असताना देगलूर शहर व परिसरात लोकजीवनामधील परंपरागत लोकतत्व अभ्यासकांना प्रभावित करते. कारण पारंपरिक मूल्यांच्या तळाशी मागील सांस्कृतिक पाउलखुणा सापडतात. मराठी–तेलगू–कन्नड या त्रिभाषा मिश्रित समाजामध्ये जे सांस्कृतिक संक्रमण घडून संस्कृती आकाराला आलेली आहे, तिच्यातील समन्वयवादी सांस्कृतिक मूल्य कित्येक वर्षांपासून समाजामध्ये घडलेल्या घुसळणीमधून नवनीत रुपी आकाराला आलेली असतात. यामूल्याची पडताळणी करत असताना देगलूर परिसरातील लोकजीवनामध्ये प्रचलित लोकगीते संकलित करुन प्रस्तुत लेखनप्रपंच साकारणे शक्य झाले आहे.

गृहिते– १. देगलूर परिसरात आढळणारी लोकगीते प्रस्तुत विषयाची मांडणी करण्यासाठी मध्यवर्ती समजण्यात आलेली आहेत.

२. लोकवाङमयाच्या चाकोरीतच हे लेखन कार्य करण्यात येत आहे.

३. लोकतत्व आणि बदलते लोकजीवन यातील धागा पकडून संशोधन व्हावे, असे वाटते.

लोकगीत संकल्पना–

लोसाहित्यामध्ये मानवी लोकजीवनाच्या परंपरागत मौखिक आविष्काराला लोकवाङमय म्हणतात. लोकवाङमयामध्ये लोकगीत, लोककथा, लोककथागीत, उखाणे म्हणी, वाक्प्रचार व वाङमयीनदृष्ट्या महत्वाचा भाग आहे. यापैकी लोकगीतांच्या व्याख्या खालीलप्रमाणे पाहता येतील.

१. लोकगीत म्हणजे ज्या लोकसमूहाचे वाडमय अलिखित आणि मौखिक परंपरेने चालत येते, त्याचे संगीतमय गीत.–(स्टॅंडर्ड डिक्शनरी ऑफ फोकलोर मायथॉलॉजी अँड लिजेंड भाग दोन, पर. १०३२)

२. लोकगीत म्हणजे आदिकालीन स्वयंस्फूर्त संगीत. (एनसायक्लोपीडीया ब्रिटानिका, भाग ९, प. ४४७)

३. अज्ञात व्यक्तीने रचलेले आणि समाजात मौखिक परंपरेने संक्रमित होणारे संगीत म्हणजे लोकगीत.

४. व्ही विलियम्स : लोकगीत नवेही नसते आणि जुनेही नसते. वनातील वश्क्षांप्रमाणे त्याची मुळे भूतकाळात खोलवर रुजलेली असतात, परंतु तिला नित्यनुतन शाखापुष्पफळे येत असतात.

५. देवेंद्र सत्यार्थी : लोकगीताचे मूळ समूहाच्या संगीतात असते.

६. के.बी. दास : लोकगीत अशा लोकसमूहाच्या जीवनाची स्वयंस्त्रोत अभिव्यक्ती आहे, जे अधिकेतर आदिम आवस्थेत जीवन जगतात

६. वासुदेवशरण अग्रवाल : लोकगीत लोकसमूहाच्या संस्कृतीचे चित्र असते.

७. डॉ. तेजनारायण लाल : लोकगीत आमच्या जीवनविकासाचा इतिहास आहे.

८. डॉ. चिंतामणी उपाध्याय : सामान्य लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवर सहज रुपाने मनोभांवाची झालेली लयात्मक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत.

९. डॉ. सत्येंद्र : ज्या गीतात लोकमानसाची अभिव्यक्ती असते, अशा गीतांचा समावेश लोकगीतांत होईल.

१०. वि.का. राजवाडे : अमूक एका व्यक्तीची कारागिरी त्याच्यात दिसणे शक्य नसते, लोकगीते, उत्सवप्रसंगी भक्तिभावाने तल्लीनता प्राप्त झाली असता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात.



११. डॉ. ना. गो. नांदापूरकर : लोकवाडमय म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाडमय तेच होय. याचा कर्ता लोकच. अर्थात अज्ञात अशी लोकसमाजातील व्यक्ती. यास्तव लोकांनी केलेले लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेबरोबरच चालत आलेले वाडमय होय.

१२. डॉ. सरोजिनी बाबर : विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढयान्पिढया एका पिढीपासून दुसरया पिढीपर्यंत चालत येणारे आपल्या नवनवोन्मेषशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत. हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय.

लोकगीताचे स्वरूप:– लोकगीत प्रथम पासून असल्याने पुढे लोकनृत्य लोकसंगीताची साथ लाभल्याने जनमाणसात खोलवर रजली.

ना. रा. शेंडे : आदिसंतानी शून्यातून नियतीच्या कलानुसार जीवन आविष्कृत केले नव्हे ते अलंकृतही केले आहे. त्यांनी ध्वनी निर्माण केला आणि त्याला शब्दाकार दिला. शब्दात त्यांनी विविध भावरंग भरले. तरल कल्पकतेने शब्दांशब्दांनी मधुर प्रभावी जुळणी केली आणि नवरसांनी त्यांनी लोकवाडमयाची सहजस्फूर्त उभारणी करून रंगरूपासह त्याचा अत्यंत मधुर गंध सर्वत्र दरवळवला. ध्वनी, शब्द, रंग, रुप आणि गंध याचा लोकसाहित्यातून आविष्कार घडवूनच नव्हे, तर नाटय, नृत्य, संगीत इत्यादी कलांची निर्मिती करून आदिसंतानानी जीवन तेजोवर्धीत केले. विविध पैलूची रसोत्कट अभिव्यक्ती घडविला आणि आपल्या संस्कृतीची अस्मिता प्रकट केली. (लोकसाहित्य: उदगम आणि विकास)

भारताच्या आदिसंतानाचे भिल्ल, कोरकूरु बंजारा आंध माडिया गोंड नागा कोलाम वारली वाडमय भांडार जंगलात राहणारे, द–याखो–यातून हिंडणारे अन्य जमाती तसेच महार मांग कैकाडी वैदू चांभार इत्यादी अंतज्य समजल्या जाणारे मराठा कुणबी इत्यादी लोक हेच खरे वारसदार शहरी भागातील लोकांपेक्षा ग्रामीण भागातील लोकांशी हा वारसा जपला त्यात भर टाकली तो विकसित केला, दुस–या पिढीस देण्यासाठी अनमोल ठेवा जतन केला.

प्रथमत: अशिक्षित अडाण्यांनी कला–सस्कृती यांच्या हृदय व प्रेरक आविष्कार घडविला आणि पुढे मुलाधारावरच भारतीय साहित्य कला आणि संस्कृती विकसित हा आदर्शमय लोकसाहित्य पहिला ध्वनी निनादला तो द–याखो–यातून कडया कपारीतून माळरानावरन हा सहजस्फूर्त निसर्गनिर्मित पुढे अनेक ध्वनी मिळाले त्याचे मधुर संगीत झाले निसर्गाची साथ आणि लोकजीवनाशी लोकजीवनावर लोकसाहित्याची एकरुप होउन जीवन संगीत स्फूरु लागले. लोकजीनातील अनुभव हीच तिची संपदा निसर्ग हाच तिचा वैभव, कळस जिव्हाळा आहे प्रेम आहे. आदिवासीमध्ये उगम पावलेले लोकसाहित्याचे अनेक धुमारे फुटून आज त्यांचा मोठा वृक्ष होउन वृक्षाला अनेक फांदया फुटल्या, फुला–फळांनी बहरफन त्याचा सुगंध सर्वत्र दरवळतो आहे.

लोकगीतातील लोकतत्त्व– देगलूर परिसरातील प्रचलित लोकगीतातून लोकजीवनामधील लोकतत्त्वांचा प्रत्यय येतो. सदय परिस्थितीत लोकगीते ग्रामीण भागात तथा निरक्षर परंपराप्रिय समाजात मोठया प्रमाणात आढळतात. ते सास्कृतिक संचित मध्यवर्ती मानून संकलित केलेल्या पुढील लोकगीतांच्या आधारे लोकतत्वांचा मागोवा घेता येतो.

कृषिसंस्कृतीने समाजात रूढ असलेल्या कल्पना आणि विचार या लोकतत्वांची प्रचिती खालील गीतातून येते.

कुण्या दिवशी भोजनास पक्वान्न तर कुण्या दिवशी खाया मिळेना अन्न

कुण्या दिवशी खंडया खंडया शेत गेलं पिकून

कुण्या दिवशी गोंडर खातोय फुंकून

कुण्या दिवशी हंडेच्या हंडे खीर गेली विटून

कुण्या दिवशी खरवड खातोय पुसून

कुण्या दिवशी शाल पांघरुन बसलाय घरात

कुण्या दिवशी वेकटं मिळना पडलाय उन्हात



स्वस्थ असावे, हरी ठेवील तैसे राहवे (संकलित गीत )

परंपरागत दैववादी कृषि जीवनात याबददलचे महत्त्व कसे आहे, वरील गीतातून अनुभवास येतो.

सण–उत्सवाच्या गाण्यातून लोकतत्वांचा अनुभव येतो. दिवाळी सण–उत्सवाच्या निमित्ताने भाउबीजेच्या दिवशी बहीण भावाला ओवाळते. त्या निमित्ताने बहिणीची भावावस्था खालील गीतातून व्यक्त होते.

बाई दिवाळीच्या दिवशी

भावामागे बहीण उभा

त्याची पाठ देते शोभा

बाई दिवाळीच्या दिशी

माझया आरतीत कोंद

ओवाळिते तुझे गेंद

बाई दिवाळीच्या दिशी

माझया आरतीत केळ

ओवाळिते तुझे बाळ

बाई दिवाळीच्या दिवशी

रेशमाचा करदोरा

कसं बांधू भाउरायाला

चाळीच्या कमराला

बाई दिवाळीच्या दिवशी

भावामागे बहीण उभा

त्याची पाठ देते शोभा (संकलित गीत )

बहीण भाउ यांच्या नातेबंधाप्रमाणेच परंपरेने चालत आलेल्या विविध नात्यांतील संबंध लोकगीतामधून आढळतात. तसेच कृषिसंस्कृतीशी निगडित पशू–पक्षी, प्राणी यांच्याबददलची कृतज्ञता लोकगीतामधून प्रकट होते.

सायंकाळच्या समयी

स्वयं सांजोळ झाली

दिव्याची जल्दी करा

लक्ष्मी येणे घरा

बैलाच्या खुरा (संकलित गीत )

सायंसंध्येच्या वेळी शेतातील कामे करुन गोठयामध्ये परतणा–या बैल या प्राण्याबददल आदरभाव व्यक्त झाला आहे. खेडयातील माणसाचे प्राण्याशी जुळलेले जिव्हाळयाचे संबंध यातून प्रकट होतात.

ग्रामीण जीवनामध्ये विविध विधी, विधीगीते प्रचलित आहेत. लग्न, मुंज, बारशे, डोहाळे इत्यादी प्रसंगी संस्कारगीते साजरे करण्याची प्रथा प्रचलित आहे. पुढील गीतातून डोहाळेविधीच्या निमित्ताने मानवी जीवनात सर्जनाचे काय महत्त्व आहे, ह कथन करत असताना निसर्गातील प्रतिमा आणि प्रतिकांचा संदुक्तिक वापर केलेला दिसतो.

पहिल्यानं ग गर्भीण

खाउ वाटलेले खाय



माहेराला जाय

आला पर ते माय

बापू माझया राजसाचा

बागामधी लावा कलमी आंबा (संकलित गीत )

प्रसूतीच्या हा स्त्रियांच्या जीवनातील पुर्नजन्माचा आनंद देणारा प्रसंग बाळंतपणानंतर बाळाचे भविष्य घडण्यासाठी जन्मदाते पाचवीच्या विधीच्या निमत्ताने कोणत्या वस्तूचे पूजन करत असत. त्यातून बाळाचे भवितव्य सूचित करण्याचा लोकतत्वीय विचार दिसतो.

पहिल्यान बाळांतीन

तुझया बाळांतपणाच भार

उशाला तलवार

पाचवीच्या दिशी

पाटावर पुंजणार (संकलित गीत )

पाचवीच्या दिवशी बाळाचं नशीब सटवी लिहिते. तो बाळ पराक्रमी निघावा या दश्ष्टीने विधी संपन्न केले जातात. त्याचे प्रातिनिधिक दर्शन वरील गीतातून घडते.

पाळणागीते लोकजीवनात प्रचलित आहेत. बारशाच्या निमित्ताने अथवा अन्य समायोचित प्रसंगी पाळणागीते गायिली जातात.

तिक्या मासी तीन कोणी राया

पिंड घडविला केशवी राया

जो बाळा जो रे (संकलित गीत )

अशा प्रकारच्या पाळणा गीतातून देवदेवताविषयक महात्म्य तथा ऐतिहासि महापुरूषाचे गुणवर्णन केले जाते. त्याचा प्रत्यय वरील गीतासारख्या पाळणा रचने लोकतत्वांचा अनुभूती देतो.

शिपाईन बाई शिपाई दादा

पाळण्याचा चांदवा झाला की नाही

येथे जावाई करते धाई राधिका जाते ग बाई

झु बाळा झु रे पाळण्याच्या बाई वरी

चिमण्याचा गलबला

आनंदाची झोप तुला

या बाळराजाला आनंदाची झोप तुला (संकलित गीत )

ग्रामरचनेतील बलुतेदार आणि आलुतेदार यांच्या परंपरागत समाजव्यवस्थे असलेल्या कार्यक्षेत्रांच्या उल्लेखातून पाळणागीतांची रचना झालेली दिसते. खेडयाती एकसंधता हा ग्रामरचनेचा अविभाज्य भाग आहे याचे प्रत्यत्तर अशा गीतातून घडते.

समारोप : भारतीय परंपरा आणि संस्कशती या दश्टीने लोकगीताचे महत्त्व आ लोकगीताव्दाप्रतशती आणि प्रकशती उदात्त असून तिला लोकजीवनाचा स्पर्श झाल्यामु अधिक वैशिष्टपूर्ण वाटते. लोकगीताची तुलना वेद श्रुती–स्मृतीशी करून लोकसाहित्या अलौकिकत्व सिध्द करण्याचा पयत्न ब–याच लोकसाहित्य विशारदांनी केलेला आ देगलूर परिसरात धनगर, गोल्ला, मन्नेरवारलू, पदमशाली, कोळी, अशा अनेक जमा वास्तव्य करतात. त्यांचे बोली संचित लोकगीत संकलित करुन प्रस्तुत लेख तयार करण्या आलेला आहे.



परंपरागत व्यवहार, आचार–विचार संस्कशती अनुभव यांची गीत कथा, सैंगीत इत्यादी प्रकारातून व्यक्त लोककजीवनाचे व लोकसंस्कृतीचे विविध चित्रे रेखाटलेली दिसतात. हे खेडूत बंधू–भगिनीने जीवापाड जतन करुन पुढच्या पिढीला देण्याचे अव्याहत कार्य स्वत:च्या आत्मा ओतून सामावल्यामुळे लोकसाहित्य जिवंत ठरले. ग्रामीणांच्या निरागस हृदय सागरातून उगम पावलेली व त्यांच्याच मुखातून तरंगत पावून अखंडपणे खळखळ वाहत जाणारी, वाहत असताना इतरांना सुखावणारी ही लोकगंगा आहे. लोकजीवनातील सुखदु:खाचे आचार विचारांचे रितीरिवाजांचे संस्कशती वैशिष्टयाचे असे अनेक प्रवाह लोकगंगेत मिसळल्याने ती विकसित झाले. तिचे पात्र वाढतच गेले. या लोकगंगेच्या वाढत्या पात्रासोबतच तिच्या दोन्ही तीरावरील लोकजीवन विकसित होत गेले. देगलूर परिसरातील लोकगीताचे संकलन, संपादन आणि अभ्यास करताना प्रस्तुत लोकगीतातील लोकतत्वांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

आदिसंतानांचे वारस देगलूर परिसरात मोठया प्रमाणात राहतात. त्यांच्या पूर्वजांनी लावलेले लोकगीताचे रोपटे आज अनेक शाखा पुष्प फळे फुटून लोकगीत, लोककथागीत, लोककथा ही महत्वाची अंगे विकसित होउन डौलदार वृक्षप्रमाणे आढळते. उखाणे, म्हणी वाक्प्रचार आणि लोकसमजुती, लोकभ्रम, लोकप्रथा, काही धार्मिक व सामाजिक विधी इत्यादी धुमारे फुटून त्याचा विकास झाला. लोकसंगीत लोककला, लोकनत्य इत्यादी प्रकार लोकजीवनातून दालन भव्य–दिव्य अलिखित, अक्षरवाडमय अस्मिता, उच्चतम श्रुती, उदात्त संहिता, भारतीय जीवन संस्कृतीचा प्रेरक इतिहास, प्रभावी लोकगाथा त्यामधून प्रवाहित झाला, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये

डॉ. विठ्ठल जंबाले, प्रमुख, मराठी विभाग,

देगलूर महाविद्यालय, देगलूर